19

Special Issue February 2018

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# Vidyawarta®

International Multilingual Research Journal

Jawahar Education Society's

## Vaidyanath College

Parli-Vaijnath, Dist.Beed (Maharashtra)

**Reaccredited by NAAC with 'B' Grade (CGPA2.53)**

Affiliated to Dr.Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad.

**National Seminar**

on

# Disaster Management

[illegible]ry,2018

Organized By

Department of Public Administration & Geography

Chief Editor

**Dr.Ippar R.K.**

Principal, Vaidyanath College & Senate Member,
Dr.BAMU,Aurangabad

Editor

**Dr.J.B.Kangane**
Head Dept. of Public Administration

**Dr.V.L.Phad**
Head Dept. of Geography

Scanned by CamScanner

66) " आपत्ती व्यवस्थापन : काळाची गरज "
प्रा. डॉ. कालिदास दिनकर फड, ता.जि. औरंगाबाद || 197

67) मानव निर्मीत आपत्तीचे कारणे, परिणाम आणि उपाय
प्रा .डॉ. काशीद एस.व्ही , कन्नड || 199

68) भारतीय जंगलातील वणव्यांचे व्यवस्थापन (Management of Forest Fire in India)
प्रा.डॉ. वाघमारे हरी साधू , ता.जि. लातूर || 201

69) मानवनिर्मित हरितगृह वायू आणि जागतिक तापमानवाढ व परिणाम
श्री. आदिनाथ मुकूंदराव नागरगोजे & श्री. संतोष सिताराम सोंडगे, नांदेड || 205

70) "नैसर्गिक आपत्तीचे व्यवस्थापन एक भौगोलिक अभ्यास"
प्रा.डॉ.घुगे एस.पी. & प्रा.पठाण के.एम., जि.बीड || 209

71) आपत्ती व्यवस्थापनात प्रशासनाची भूमिका
प्रा. पेरके वैशाली शेषराव, जि. औरंगाबाद || 212

72) आपत्ती व्यवस्थापन
प्रा. अर्चना भगवानराव काळे , औरंगाबाद || 213

73) निसर्गनिर्मित व मानवनिर्मित आपत्तीचा अभ्यास
प्रा. डॉ. मुळे अंबादास मारोतीराव & प्रा. डॉ. राठोड सुनिल धोंडिराम , अहमदपूर || 217

74) महाराष्ट्रातील आवर्षण : कारणे व उपाययोजना
डॉ.जे.आर. सोळुंके & प्रा.एन.एम. राठोड , जि.बीड || 219

75) नैसर्गिक आपत्ती नियोजन आणि अंमलबजावणी
प्रा. डॉ. एम. एफ. राऊतराहे, परभणी || 223

76) आपत्ती व्यवस्थापन आणि प्रशासन
कांबळे प्रशांत संपत्ती & स.प्रा. मुसळे नवनाथ पंढरीनाथ, जळकोट || 225

77) आपत्ती व्यवस्थापन : एक चिकित्सक अभ्यास
डॉ.संजीव कोळपे, गंगाखेड || 227

78) आपत्ती व्यवस्थापनात प्रशासनाची भूमिका व आव्हाने
श्रीमती गांगर्डे प्रतिभा रामचंद्र, जि. उस्मानाबाद || 232

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com



Scanned by CamScanner

करण्यासाठी, योग्य आणि सुत्रबध्द व्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टिने, प्रभावी संदेशवहन व संपर्क साधनाच्या उपाययोजनाच्या दृष्टिने, सर्वांगिण सामाजिक सुरक्षिततेच्या दृष्टिने.

वरीलप्रमाणे सर्वसामान्य नागरीक, स्वंयसेवी संस्था संघटना, सैन्य प्रशासन आपत्तीकालीन परिस्थितीमध्ये व आपत्तीतोर परिस्थितीमध्ये सर्वाचे योगदान महत्वाचे समजले जाते.

संदर्भ -

१) लोकप्रशासनातील नव प्रवाह डॉ. पंचशील एकंबेकर प्रा. दिपक वाघमारे, प्रा. विजय तरोडे

२) Disaster Management Act. २००५ in India

३) लोकप्रशासनातील नवे विचार प्रवाह - डॉ. शंकर लेखने, प्रा. गोविंद येडले, डॉ. जिवन गंगणे ओमसाई प्रकाशन देगलुर

❑❑❑

**77**

# आपत्ती व्यवस्थापन : एक चिकित्सक अभ्यास

**डॉ.संजीव कोळपे**
भूगोल विभाग,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गंगाखेड.

**************

**सारांश :**

आजपर्यंत पृथ्वीने अनेक नैसर्गिक आघात सोसले आहेत, ज्यांचे वर्णन ऐकून सुद्धा मानवी मन थक्क होते. अशा आघातांमुळे पृथ्वीचे तसेच मानवाचे अतोनात नुकसान झालेले आहे. आपल्या देशात अनेक आपत्तींशी संघर्ष करावा लागतो. प्रामुख्याने नैसर्गिक व मानवनिर्मित असे दोन भाग आपत्तीचे करण्यात आले आहेत. देशात पुन्हा पुन्हा उद्भवणाऱ्या आपत्ती आणि त्यामुळे प्रभावित होणारे पर्यावरण व मानवी जीवन याचा विचार होणे आवश्यक आहे. आपत्ती व्यवस्थापन ही एक विस्तृत स्वरुपाची विद्याशाखा म्हणून उदयास येत आहे. भारत सरकारने स्थापन केलेले 'राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण' याच दृष्टीने टाकलेले पहिले पाऊल आहे. आपत्ती आणि व्यवस्थापन कार्यपद्धती, आपत्ती व्यवस्थापनाची गरज, भारत सरकारचा आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रम, आपत्ती संदर्भात महाराष्ट्र शासनाचे व्यवस्थापन, प्रसारमाध्यमांची आपत्ती निवारणासाठी असलेली महत्त्वाची भूमिका जाणून घेणे आवश्यक आहे. आपत्तीच्या निवारणासाठी शाळा, महाविद्यालय यासारख्या विविध शैक्षणिक संस्थांचा सहभाग किती महत्त्वाचा आहे यावर विचार होणे गरजेचे आहे. आपत्तीप्रवण क्षेत्रातील नागरिक यांनाही 'समूह तत्त्वावर आधारित आपत्तीतील धोक्याचे व्यवस्थापन' यावर प्रशिक्षण देण्याची गरज आहे. हे कार्य यशस्वी होण्यासाठी नागरीसंस्था, स्वयंसेवी संस्था, पंचायतराज संस्था इत्यादींचे सहकार्य आवश्यक आहे. आपण जर



Scanned by CamScanner

आपत्तीबाबत जागरुक नसलो तर कित्येक दशकांच्या मेहनतीवर क्षणात पाणी फिरु शकत व होत्याचे नव्हते होते. यासाठीच क्षणाचाही विलंब न करता एक आपत्तीप्रतिरोधक भारत बनविण्यासाठी कंबर कसली पाहिजे. राष्ट्रीय आपत्ती प्राधिकरण व केंद्र सरकारचे आपत्तीविषयक धोरण यासारख्या विविध विषयांवर या शोध निबंधात दृष्टिक्षेप टाकला आहे.

जागतिक स्तरावर आपत्कालीन व्यवस्थापना बाबत जागृती, उपाययोजना, प्रशिक्षण यापूर्वीच वाढीस लागलेले आहे. गेल्या कांही वर्षात भारतात अनेक भीषण नैसर्गिक आपत्ती येऊन गेल्या. शासन स्तरावर भारतामध्ये देखील आता मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. आपत्तीमुळे झालेली हानी कमी करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन महत्त्वाचे आहे. येणारा धोका ओळखणे, संवेदनशील भागाचा अभ्यास करणे, कार्याचे विभाजन करुन व्यक्तिवार जबाबदारी देणे ही आपत्ती व्यवस्थापनाची वैशिष्ट्ये आहेत. आपत्ती व्यवस्थापनामध्ये मुख्यत: आपत्ती टाळण्याचे प्रयत्न करणे, अटळ आपत्तीला सामोरे जाण्याची तयारी करणे, आपत्ती काळात व आपत्तीनंतर करावयाची कामे याचे रीतसर नियोजन इत्यादी बाबींचा समावेश होतो. त्यादृष्टीने आपत्कालीन व्यवस्थापन प्रशिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे.

**प्रस्तावना :**

जागतिक नकाशावरील भारताचे भौगोलिक स्थान आणि भूगर्भशास्त्रीय रचनेमुळे भूकंप, वादळे, पूर, जमीन खचणे यासारख्या नैसर्गिक आपत्ती वारंवार घडतांना आपण पाहिले आहे. नैसर्गिक आपत्तीखेरीज मानवी चुकांमुळेही काही संकटे उद्‌भवल्याचे आपण अनुभवले आहे. आपत्ती म्हणजे अशी घटना की ज्यामुळे अगदी आकस्मिकपणे प्रचंड जीवित हानी व अन्य प्रकारची हानी संभवते. हे जरुरी नाही, की प्रत्येक आपत्ती ही अचानकपणे उद्‌भवते. आजच्या तंत्रज्ञानाने अशी बरीच साधने विकसीत केली आहेत की, ज्याने संभवणाऱ्या आपत्तींचे पूर्वानुमान लावणे शक्य होते. असे असले तरी अजूनही काही नैसर्गिक तसेच जवळजवळ सर्व मानवनिर्मित आपत्तींचे अचूक अंदाज वर्तविणे शक्य झाले नाही. यामुळेच बऱ्याच आपत्ती ह्या अचानकपणेच उद्‌भवतात. आपत्तींबाबत पूर्वसूचना जरी असली तरी तिचे अचूक स्थान, व्याप्ती तसेच तीव्रता याबाबत पूर्वानुमान काढणे शक्य नसते. आणि म्हणूनच प्रचंड हानी होते. आपल्या समाजामध्ये असलेल्या जनजागृतीच्या अभावामुळे विकास आणि आपत्ती याचा असणारा परस्पर संबंध लोकांना माहीत नसतो. येथे ही वस्तुस्थिती जाणून घेणे गरजेचे आहे. जेव्हा कधी पर्यावरणाचे महत्त्व डावलून विकास करण्याचे प्रयत्न केले जातात तेव्हा आपत्ती ही तिचे विकराळ रुप घेऊनच आपल्यापुढे उभी राहते. असे असले तरी दूरदृष्टिकोनातून बघितल्यास आपत्ती ही वरदानसुद्धा सिद्ध होऊ शकते. झालेल्या चुकांपासून नवा बोध घेऊन नव्या क्षमतेने उभे राहणे हा मानवाचा गुणधर्म आहे आणि यातूनच आपत्तीमध्ये वाचलेल्या लोकांसाठी एक नवे भविष्य बनविण्याची जिद्द निर्माण होते. तसेच एका नव्या पर्वाला सुरवात होते. परंतु ज्यांना आपत्तीची झळ पोहोचली आहे, त्यांच्यासाठी आपत्तीचे परिणाम हे भयावह असतात. आपत्ती ही नैसर्गिक असो किंवा मानवनिर्मित तिच्यामुळे होणारी हानी ही प्रचंड स्वरुपाची असते.

आपत्ती या ओढवणारच! त्या ओढवू नयेत यासाठी प्रत्येकानेच सावधगिरी घ्यायला हवी अन् ओढवल्याच तर त्यांचा प्रतिकार करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. आपत्ती याव्यात असे कुणालाच कधीही वाटत नाही. तथापि, त्या ओढवल्याच तर त्यांची तीव्रता पद्धतशीरपणाने कमी करता येते. आपत्ती या नियोजित नसतात. परंतु योजनाबद्ध प्रयत्नांनी त्यांचे निवारण होऊ शकते. आपत्ती निर्माण झाली की ती सौम्य करण्यासाठी प्रयत्न करणे हे ओघानेच येते. एक गोष्ट घडली की, तिची प्रतिक्रिया म्हणून दुसरी गोष्ट ही घडवावी लागतेच. संकटे ही आधी घडतात. त्यांची कारणे नैसर्गिक किंवा मानवनिर्मित असतात. त्यांच्या निवारणासाठी धडपड करणे ही प्रतिक्रियात्मक स्वरुपाची घटना आहे. ते स्वाभाविकच घडते. तथापि, त्या संदर्भात जर योजनाबद्ध प्रयत्न केले, व्यवस्थित ठरवून सर्व गोष्टी केल्या तर त्यांचे फळ अधिक मिळते. साहजिकच व्यवस्थापनाच्या संदर्भातील तत्त्वज्ञान, त्याची कार्यपद्धती व नेतृत्वाकडून घेतले जाणारे योग्य प्रकारचे निर्णय व



Scanned by CamScanner

त्याची कार्यवाही या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. यांचा अर्थ असा की शास्त्रशुद्ध पायावर होणार प्रयत्न, नेतृत्त्वाकडून अवलंबली जाणारी व्यूहरचना आणि व्यवस्थापनातील सुयोग्य तंत्रांचा वापर याद्वारे आपत्ती व्यवस्थापनाचे कार्य चांगल्या प्रकारे होऊन ते अधिक लाभदायक ठरते. 'पर्यावरण सुरक्षित बनवण्याचे कार्यक्षेत्र' या व्यवस्थापनात असते. 'जीविताची सुरक्षितता' हे त्याचे कार्य असते तर 'संकटांवर मात करून टिकून राहण्याचे उद्दिष्ट' त्यामध्ये साधले जाते. काळाची गरज म्हणून पर्यावरणाचा समतोल कायम राखण्यासाठी त्याचे व्यवस्थापन काळजीपूर्वक करणे आवश्यक आहे. अन्यथा, एक दिवस मानवाच्या अस्तित्वालादेखील धोका आहे. हे एखाद्या भविष्यकाराने सांगण्याची गरज नाही. त्यावेळी तेथील जनता आणि शासनयंत्रणा यांना त्याबाबतीत दक्ष राहण्याची आपली कर्तव्ये जबाबदारीने पार पाडण्याची भूमिका बजावावीच लागते. व्यवस्थापन शास्त्राच्या भाषेत असे झाले तरच 'आपत्ती व्यवस्थापन' हे उत्तम दर्जाचे होते.

**उद्दिष्ट्ये :**

१. आपत्ती व्यवस्थापनाच्या कारणांचा/हेतूचा शोध घेणे.

२. भारत सरकारचे आपत्ती व्यवस्थापन धोरण जाणून घेणे.

३. आपत्ती व्यवस्थापनाविषयी महाराष्ट्र शासनाची भूमिका अभ्यासणे.

४. आपत्ती व्यवस्थापनात प्रसिद्धी माध्यमांची भूमिका जाणून घेणे.

५. आपत्ती व्यवस्थापनात शैक्षणिक संस्थांच्या सहभागाचा अभ्यास करणे.

६. आपत्ती निवारणासाठीच्या उपायांचा शोध घेणे..

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम स्त्रोताचा उपयोग करण्यात आला आहे. त्यामध्ये संदर्भ ग्रंथ, संशोधन पत्रिका, मासिके, वर्तमानपत्रे, पुस्तके, इंटरनेट यांचा उपयोग करण्यात आला आहे.

**विषय विवेचन :**

**आपत्ती म्हणजे काय? :**

"अचानक आलेले संकट, अपघात अथवा दुर्घटना कोणत्याही क्षणात घडली असून ती मानवनिर्मित असो वा नैसर्गिक असो, ज्या घटनेद्वारे व्यापक प्रमाणात मानवप्राणी वा मालमत्ता अथवा दोन्ही प्रकारची हानी झालेली असेल आणि अशा संकटाचा प्रतिकार करणे स्थानिक लोकांच्या आटोक्याबाहेर असेल अशा संकटास आपत्ती असे म्हणतात." संयुक्त राष्ट्रांनी आपत्तीची व्याख्या करताना असे म्हटले की, "अशी घटना की, ज्यामुळे अगदी आकस्मिकपणे प्रचंड जीवित हानी व इतर प्रकारची हानी संभवते त्यास आपत्ती असे म्हणतात." तर जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, "मानवास आलेल्या संकटाची त्यास कोणतीही पूर्वसूचना नसते, आपत्तीमुळे होणारी विध्वंसक परिस्थिती फारच भयानक स्वरूपाची असते व त्यानुसार होणारी वित्तहानी व जीवितहानी सहजासहजी भरून न निघणारी असते त्यास आपत्ती असे म्हणतात." आणि "आकस्मिकपणे ओढवलेले मोठे दुर्दैवी संकट म्हणजे आपत्ती होय."

**आपत्तीचे प्रकार :**

१. पर्यावरणविषयक आपत्ती २. भौगोलिक आपत्ती ३. अतिरेकी व कलहामुळे उद्भवलेली आपत्ती ४. निष्काळजीपणामुळे निर्माण झालेली आपत्ती ५. जैविक आपत्ती ६. नैसर्गिक आपत्ती ७. मानवनिर्मित आपत्ती

**आपत्ती व्यवस्थापन म्हणजे काय? :**

"ज्या प्रक्रियेत सुनियोजन, संघटनात्मक कृती आणि समन्वय याद्वारे अमलबजावणी करण्याची उर्वरित व एकात्म अशी जी क्रिया घडते त्यास आपत्ती व्यवस्थापन असे म्हणतात."

**भारत सरकारचे आपत्ती व्यवस्थापन :**

भारतातील आपत्ती व्यवस्थापन या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा उद्देश आपत्तीला सामोरे जाण्यासाठी समुचित नियोजन करणे, हा आहे. परंतु आपत्तीचा संभाव्य नैसर्गिक धोक्याची माहिती घेऊन त्याची तीव्रता कमी करणे, हासुद्धा एक मुख्य उद्देश आहे. त्यासाठी भारतातले आपत्तीप्रवण १२ राज्यातील १२५ जिल्हे निवडले आहेत. महाराष्ट्रामध्ये हा कार्यक्रम १४ जिल्ह्यामध्ये राबविण्यात येत आहे.

**महाराष्ट्र शासनाचे आपत्ती व्यवस्थापन :**

केंद्र सरकारने आपत्तीविषयक धोरण जाहीर



Scanned by CamScanner

सर्व राज्यांना सतर्क केले आहे. या संदर्भात कायदा करुन सरकारने करावयाच्या कामांबाबतची आखणी, रुपरेषा स्पष्ट केली आहे. महाराष्ट्र शासनानेही यात पुढाकार घेऊन प्रभावी अंमलबजावणी सुरु केली आहे. अतिवृष्टी व पुरामुळे उद्‌भवणारी आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी विभागनिहाय बनविण्यात आलेली कार्यपद्धती परिपूर्ण आहे. उपलब्ध साधनसामग्रीचा आढावा घेऊन आवश्यक असलेली साधनसामग्री आणि औषधे यांचा पुरवठा सुनिश्चित करण्यात येतो. मुंबई महानगरपालिकेच्या परिसरात २४ ठिकाणी समकक्ष हवामान यंत्रणा स्थापन करुन अतिवृष्टीविषयक माहिती दर दोन तासांनी संबंधित विभागाला उपलब्ध करण्यात येते. मुबई व शहरातील आपत्कालीन व्यवस्थापनासाठी अद्ययावत आपत्कालीन कार्य केंद्र महापालिकेतर्फे कार्यान्वित करण्यात येते. मंत्रालयातील आपत्कालीन कार्य केंद्राचे आधुनिकीकरण व विस्तारीकरण नुकतेच पूर्ण झाले आहे. केंद्र राज्यामध्ये आपत्कालीन व्यवस्थापनविषयक कार्याचा समन्वय साधण्याचे कार्य करते. दोन्ही आपत्कालीन कार्य केंद्रे दूरध्वनी, फॅक्स, इंटरनेटद्वारे जोडण्यात आली असून विनाविलंब संपर्क साधण्यासाठी हॉटलाईनही बसविण्यात आलेली आहे. शिवाय व्हीएचएफ या जलवाहन यंत्रणेद्वारे दर तासाने आपत्ती व्यवस्थापनविषयक माहिती व त्याचा आढावा मंत्रालय स्तरावर घेण्यात येतो.

**आपत्ती व्यवस्थापनात प्रसिद्धी माध्यमांची भूमिका**

समाजजीवनावर प्रभुत्व असणारे, सकारात्मक वा नकारात्मक गोष्टी घडवून आणण्याची ताकद असणारे, अत्यंत प्रभावी साधन म्हणून वृत्तपत्रे वा दूरचित्र वाहिन्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. आजच्या युगात पत्रकारिता एक महत्त्वाचा व्यवसाय आहे. प्रसिद्धी माध्यमांचा जनमतावर प्रभाव असतो. आपत्ती नंतर काय घडते, तर वर्तमानपत्रांमधून अतिशय विदारक, भावनाशील चित्र उभे केले जाते. याच्या उलटही घडते. आपत्ती काळात प्रसिद्धी माध्यमांनी दिलेल्या बातम्या एकप्रकारे संरक्षणच करत असतात. आगाऊ सूचना देणे, संरक्षणात्मक कामगिरी करुन आपत्तीच्या परिणामांची माहिती देणे, मार्गदर्शन करणे अशी जागरुकतेची कामे प्रसिद्धीमाध्यमांकडून केली जाते. ज्या काळामध्ये आपत्ती आलेली असते त्या काळात ज्यांच्यावर आपत्ती आली त्यांना विविध संघटना, व्यावसायिक संघ यांच्याकडून मदत मिळत असते. ही मदत प्रसिद्धी यांमुळेच मिळते कारण आपत्तीचा प्रकार त्यातील मनुष्यहानी, आणि वित्तहानी याचे योग्यचित्र प्रसिद्धी माध्यमे सर्वापर्यत पोहचवतात. मदत कशी, कुठे आणि किती याचीही माहिती प्रसिद्धी माध्यमेच इतर साधनांपेक्षा लवकरात लवकर पोहचवतात. प्रामुख्याने अन्न, वस्त्र, निवारा या प्राथमिक गोष्टी तत्काळ पीडितांना मिळण्यासाठी माध्यमे खूपच मोठ्या प्रमाणात मदत करतात.

आपत्तीच्या काळात सरकारने तत्परतेने मदत करावी ही जनतेची अपेक्षा असते. तसेच आपत्तीच्या बातम्या योग्य व थोड्या थोड्या अवधीने आणि मुद्देसूदपणे शासनासमोर आणि स्वयंसेवी संस्थासमोर जाव्यात ही जनतेची अपेक्षा प्रसिद्धी माध्यमांनी पूर्ण करावी. कधी कधी काही वृत्तपत्रे किंवा काही वृत्तचित्र वाहिन्या उतावीळपणे बातम्या लोकांना देतात आणि त्याचा आपत्तीतील पीडितांवर फार मोठ्या प्रमाणात विपरित परिणाम होऊ शकतो. त्यामुळे प्रसिद्धी माध्यमांनी चुकीची किंवा अयोग्य बातमी देऊन अफवा पसरवू नये. आपत्ती ओढवलेल्यांवर ताबडतोब पत्रकारांनी पीडितांना प्रश्न विचारु नयेत. संबंधित व उपस्थित अधिकाऱ्यांवर शक्यतो कोणीही आक्षेप घेऊ नये. त्यांच्या मदतीने उपस्थित सामान्य नागरिकांना बरोबर घेऊन या वृत्तपत्राच्या प्रतिनिधीने काम करावे. मदतीची इतर साधने उपलब्ध करण्याचा मार्ग त्यांनी शोधावा. प्रसिद्धी माध्यमांनी आपत्तीच्या काळात आणि इतर वेळेलाही आपल्या विवेकानुसार मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. मार्गदर्शन करणे हा त्यांचा अधिकार आहे. प्रसिद्धी माध्यमांनी परिस्थिती जाणून घेऊनच मार्गदर्शन करावे. अन्यथा मदत कार्यात अडथळा येऊ शकतो. घटना स्थळाला भेट देण्यापूर्वी अधिकृत सूत्रांकडून माहिती घ्यावी. माध्यमांनी पीडितांचे पूनर्वसन कसे करता येईल याची काळजी घ्यावी आणि संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन घ्यावे. व आपत्ती काळात वेळेत सावरण्यासाठी लोकोपयोगी माहिती ही सर्वात महत्त्वाची गोष्ट असते.

अशाप्रकारे प्रसिद्धी माध्यमांनी जागरुकतेने आणि



Scanned by CamScanner

तत्परतेने विवेकशील कार्य करावे. आपले कार्य करत असताना कुठलाही दबाव त्यांनी बाळगू नये. अशा वेळी प्रसिद्धी माध्यमांनी योग्य माहिती प्रामाणिकपणे प्रसिद्ध करावी. याप्रमाणे त्यांनी भूमिका बजावल्यास निश्चितपणे समाजाला न्याय मिळेल आणि प्रसिद्धी माध्यमे ही सामान्यनागरिकांचे महत्त्वाचे आधार बनतील.

**आपत्ती व्यवस्थापनाचा हेतू/कारणे :**

१. आपत्तीचे स्वरुप आणि परिणाम जाणून घेणे. २. आपत्तीची कारणे शोधणे व त्याची प्रक्रिया समजावून घेणे. ३. आपत्तीपासून होणारे तोटे कमी करण्यास सरक्षणात्मक उपाययोजना आखणे. ४. आपत्तीशी सामना करण्यास समर्थ बनविणे. ५. आपत्ती निवारणार्थ उपाय शोधून काढणे. ६. आपत्तीविषयक ज्ञान व माहिती मिळविणे. ७. आपत्तीपीडित भागातील वस्तुस्थिती जाणून घेणे. ८. उपाय योजनांची योग्य अंमलबजावणी करणे. ९. समस्याग्रस्त परिस्थितीचे आकलन करुन घेणे.

**निष्कर्ष :**

भारतातील आपत्ती व्यवस्थापन या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा उद्देश हा आपत्तीला सामोरे जाण्यासाठी वस्तुनिष्ठ नियोजन करणे आवश्यक आहे. आपत्तीचा संभाव्य नैसर्गिक धोक्याची माहिती घेऊन त्यांची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाखाली सर्व राज्यांनी एकत्रित येणे गरजेचे आहे. भारतातील जवळजवळ १२ राज्यांमधील आपत्तीप्रवण जिल्ह्यांतील विविध आपत्तीमुळे होणारी हाणी टाळण्याचा प्रयत्न करणे यास प्राधाण्य द्यावे. आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमाची अंमलबजावणी ही राज्य पातळीवर, जिल्हा पातळीवर, तालुका पातळीवर आणि गाव पातळीवर योग्य प्रकारे करून यापासून जिवीत व वित्तहानी होणार नाही यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. तरच आपत्ती व्यवस्थापनाचा हेतू साध्य होईल.

आपत्ती व्यवस्थापनासाठी भारत सरकारची मुख्य जिम्मेदारी असून त्यांनीच राष्ट्रीय पातळीवरुन आपत्ती निवारणासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. आपत्ती निवारणाचा आराखडा तयार करुन त्यात विविध घटकांना सहभागी करुन घ्यावे. यासाठी महाराष्ट्र शासन यांच्यावतीने महाराष्ट्रातील आपत्ती व्यवस्थापन करणे. आपत्ती व्यवस्थापनासाठी प्रसिद्धी माध्यमांना सहभागी करुन घ्यावे. प्रसिद्धी माध्यमांनी जागरुकतेने आणि तत्परतेने विवेकशील कार्य करावे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आपत्ती व्यवस्थापनात शाळा, महाविद्यालय यासारख्या विविध शैक्षणिक संस्थांना सहभाग अनिवार्य करणे. तत्काळ आणि ठोस कार्यवाहीसाठी, आपत्ती विमोचनासाठी विशेष दलांची स्थापना करावी. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून निश्चित व ठोस कार्यवाही करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. अंतर्गत नियम, योजना आणि दिशादर्शन करण्याची जबाबदारी ही आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने उचलणे गरजेचे आहे. 'आपत्ती व्यवस्थापन' हे एक सामुदायिक कार्य आहे. त्याविषयी सर्वांनी आपापले उत्तरदायित्व ओळखून कार्य करणे गरजेचे आहे. आपत्ती व्यवस्थापन ही एक सामाजिक बांधिलकी समजून त्याविषयी उपाययोजनांची सर्वांनी माहिती करुन घेणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**


१) आपत्ती व्यवस्थापन : डॉ.घोरमोडे, डॉ. कला घोरमोडे.

२) आपत्ती व्यवस्थापन : डॉ.संभाजी खराट

३) आपत्ती निवारण : डॉ.संभाजी पटारे, डॉ. संजय चाकणे

४) कृतिबद्ध आपत्ती व्यवस्थापन कर्नल पी.पी.मराठे, अनुवाद: जॉन्सन बोर्जेस

५) आपत्ती व्यवस्थापन संकल्पना आणि कृती : कर्नल(निवृत्त)पी.पी.मराठे, प्रा.व्ही.जे.गोडबोले


□□□



Scanned by CamScanner